पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा.विधी समिती सभा
**कार्यपत्रिका क्रमांक – १८**
**सभावृत्तांत**

दिनांक : **२१/०२/२०१४** वेळ : दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२१/०२/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) सभा आयोजनाबाबत - मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.३१,३२, व ३७ इ.ठिकाणी विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडपव्यवस्था व अनुषंगिक कामे करणे, कामाचे सुधारित अंदाजपत्रकाबाबत.

विषय क्र.६) कामाचे ठिकाण बदल करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.९ संभाजीनगर मध्ये भूमीपुजन, सांस्कृतिक कार्यक्रम, जयंती, पुण्यतिथी इ. मनपा समारंभासाठी मंडप व स्टेज व्यवस्था करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) प्रभाग क्र.१० अजंठानगर व आकुर्डीमध्ये मंडपविषयक कामे करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) प्रभाग क्र.२६ काळभोरनगर व मोहननगरमध्ये मंडपविषयक कामे करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) "ब" व "ड" प्रभाग कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहिरात फलक काढून टाकणेचे कामाचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.साधना जाधव

दिनांक २१/०२/२०१४ दुपारी १२.०० वा. ची सभा बुधवार दिनांक २६/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** दिनांक २१/०२/२०१४ दुपारी १२.०० वा. ची सभा बुधवार दिनांक २६/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

**सभावृत्तांत**

( दिनांक २१/०२/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक : **२६/०२/२०१४** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक २१/०२/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **२६/०२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. काळजे नितीन प्रताप
७) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.केदारी – कार्यकारी अभियंता, मा.पाटील – प्रशा.अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १७/०१/२०१४, ०७/०२/२०१४ व १०/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०७/०२/२०१४ व १०/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : २१८ विषय क्रमांक : १
दिनांक : २६/०२/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१९ विषय क्रमांक : २

दिनांक : २६/०२/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२० विषय क्रमांक : ३

दिनांक : २६/०२/२०१४ विभाग : आकाशचिन्ह परवाना

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/८१/२०१४, दि.०७/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेनुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात परवाना विभागाचे खर्च अंतर्गत अनधिकृत जाहिरात फलक तथा संबंधित खर्च या लेखाशिर्षांतर्गत पानांक ७३ वर अ.क्र.६ तरतूद करणेत आलेली नव्हती. तथापि शहरातील अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकणेची मोहिम सुरु करणेत आली असून यासाठी प्रथम टप्प्यात अ व क प्रभाग कार्यालयाचे क्षेत्रातील अनधिकृत फलक काढून टाकणेची कार्यवाही करणेसाठी अ प्रभाग क्षेत्राकरिता र.रु.७,८०,७३३/- व क प्रभाग क्षेत्राकरिता र.रु.१२,१४,४५४/- असा एकूण खर्च र.रु.१९,९५,१८७/- विचारात घेता परवाना विभागांतर्गत इतर लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रु.२०,००,०००/- मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५२९० दिनांक १७/१२/२०१३ तसेच आदेश क्र.आप/७/कावि/१५७/२०१३, दि. ३०/१२/२०१३ अन्वये वर्ग करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे अनधिकृत जाहिरात फलक तथा संबंधित खर्च या लेखाशिर्षावर तरतूद उपलब्ध आहे त्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिं.चिं.म.न.पा.च्या "अ" व "क" प्रभाग कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहीरात फलक काढून टाकणेसाठीचे कामाकरीता र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : २२१ विषय क्रमांक : ४
दिनांक : २६/०२/२०१४
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.साधना जाधव
संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

मा.विधी समितीची पाक्षिक सभा आगामी दि.०७/०३/२०१४ दु.१२.०० वा. ऐवजी शुक्रवार दिनांक ०७/०३/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२२ विषय क्रमांक : ५
दिनांक : २६/०२/२०१४ विभाग : इ क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.नितीन काळजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इ/स्था/कावि/१८/२०१४, दि.१३/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे इ क्षेत्रिय कार्यालयाचे प्रभाग क्र.३१,३२ व ३७ इ. ठिकाणी विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडपव्यवस्था व अनुषंगिक कामे करणेकामी येणा-या खर्चाचे र.रु.१६,९०,०००/- (अक्षरी र.रु.सोळा लाख नव्वद हजार फक्त) चे सुधारीत पूर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य.

----------

ठराव क्रमांक : २२३ विषय क्रमांक : ६
दिनांक : २६/०२/२०१४
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

सांगवी वॉर्ड क्र.५९ मधील शौचालयाचे दुरुस्ती कामाचे आदेश निर्गत केलेले आहेत. परंतु या कामातून सांगवी करसंकलन इमारती मधील नियोजित **UPSC** स्पर्धा परिक्षा केंद्राची स्थापत्य विषयक आवश्यक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२४ विषय क्रमांक : ७
दिनांक : २६/०२/२०१४
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.९ संभाजीनगरमध्ये भूमीपुजन, सांस्कृतिक कार्यक्रम, जयंती, पुण्यतिथी इ. मनपा समारंभासाठी मंडप व स्टेज व्यवस्था करणेकामी कामाचा आदेश मे.कुबेरा एंटरप्राईजेस

यांना आदेश क्र.अप्र/नि/कावि/१००६/२०१३, दि.१२/११/२०१३ अन्वये देणेत आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.७,००,२७९/- इतकी आहे. व निविदा दर ५.५४९**%** कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.२२,००,०००/- (अक्षरी र.रु.बावीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२५ विषय क्रमांक : ८

दिनांक : २६/०२/२०१४

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१० अजंठानगर व आकुर्डीमध्ये मंडप विषयक कामे करणेकामी कामाचे आदेश मे.कुबेरा एंटरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्र/नि/कावि/१०१४/२०१३, दि.१२/११/२०१३ अन्वये देणेत आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.५,६०,२२४/- इतकी आहे. व निविदा दर ५.५४९**%** कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु. १८ लाख (अक्षरी र.रु.अठरालाख फक्त) चे प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२६ विषय क्रमांक : ९

दिनांक : २६/०२/२०१४

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर व मोहननगरमध्ये मंडप विषयक कामे करणेकामी कामाचे आदेश मे.कुबेरा एंटरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्र/नि/कावि/१०१२/२०१३, दि.१२/११/२०१३ अन्वये देणेत आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.५,६०,२५०/- इतकी आहे. व निविदा दर ५.५५०**%** कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु. १८,००,०००/- (अक्षरी र.रु.अठरालाख फक्त) चे प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२७ विषय क्रमांक : १०

दिनांक : २६/०२/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

पिं.चिं.म.न.पा.च्या आकाशचिन्ह परवाना विभागाचे अंतर्गत "ब" व "ड" प्रभाग कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहीरात फलक काढून टाकणेसाठीचे कामाकरीता र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ २३५ /२०१४
दिनांक - ०१ / ०३ / २०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.